# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### गडचिरोली वन विभागांतर्गत अनेक ठिकाणी अगरबत्ती प्रकल्प सुरु करण्याबाबत

**(१) ८६७५ (०८-०४-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली वन विभागांतर्गत अनेक ठिकाणी अगरबत्ती प्रकल्प सुरु करण्याकरिता लागणारे साहित्य अवाजवी किंमतीत आंध्रप्रदेश तसेच मलेशिया व इतर देशातून खरेदी करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रोपे खरेदी, बगीचे, अगरबत्ती प्रकल्प तसेच वनविभागातील नियमबाह्य बदली प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या चौकशीत काय आढळून आले चौकशीनुसार पुढे संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०२-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.

गडचिरोली अगरबत्ती प्रकल्प हा लोकाभिमुख प्रकल्प मागील ४ वर्षापासून सुरळीतपणे सुरु आहे. या प्रकल्पासाठी लागणारे साहित्य वन विभागांतर्गत निविदा प्रक्रियेने व नियमाचे अनुपालन करुन खरेदी करण्यात आलेले आहे. या प्रकल्पामुळे जिल्हयातील १००० महिलांना शाश्वत रोजगाराची संधी उपलब्ध झालेली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरिवली (पूर्व), मुंबई वन विभागांतर्गत वन जमीन क्षेत्र कमी केल्याबाबत**

**(२) ११६७२ (०६-०४-२०१६). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरिवली (पूर्व), मुंबई वन विभागांतर्गत वन जमीन क्षेत्र कमी करुन सदर जमीन नागरी विकासासाठी वापरण्याचा निर्णय मंत्रीमंडळाने माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई उपनगरातील पवई, आरे कॉलनी, फिल्म सिटी-गोरेगांव आप्पापाडा मालाड, दामूनगर, भिमनगर, जानूपाडा, धारखाडी, केतकीपाडा-दहिसर- पूर्व, त्रिमूर्ती, कुलुपवाडी-बोरिवली-पूर्व येथील वन जमीन नागरी विकासासाठी खुली करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या जमिनीवरील सन २००० पूर्वीच्या चाळ-वस्त्या, झोपडपट्टी, नियमित करुन त्यांच्या पुनर्विकास केला जाणार आहे काय,

(४) असल्यास, याबाबतची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०४-०७-२०१६) :**(१), (२) व (३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चाळीसगाव तालुक्यातील डेरेदार वृक्षांची तोड सुरु असल्याबाबत**

**(३) १३३९९ (०८-०४-२०१६). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाळीसगाव तालुक्यातील डेरेदार वृक्षांची वृक्षतोड सुरु असून 'झाडे लावा, झाडे जगवा' चा नारा देत असताना दुसरीकडे मात्र सर्रास वृक्षतोड करणाऱ्याना पाठबळ दिले जात असल्याचे समोर आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्रास वृक्षांची वृक्षतोड करणारे व त्यांना पाठीशी घालणाऱ्यांची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार दोषींवर शासन कोणती कारवाई केली वा करण्यात येणार आहे

(४) नसल्यास, त्याचे कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२९-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही.

तथापि, जानेवारी, २०१६ ते मार्च, २०१६ या कालावधीत चाळीसगांव तालुक्यातील अवैध वृक्षतोडीच्या एकूण ९ घटनामध्ये ३९ वृक्षांची तोड करण्यात आली असून त्याची किंमत रु. ३९९७/- इतकी आहे.

(२) अवैध वृक्षतोडीबाबत वेळीच गुन्हा नोंद करण्यात येत असून सदर प्रकरणी चौकशी करण्यात येत असून आरोपीचा शोध घेण्यात येत आहे. वृक्षांची तोड करणाऱ्यांना पाठीशी घालण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पातूर (जि.अकोला) तालुक्यातील जंगल माफीयांवर आळा घालण्याच्या मागणीबाबत

**(४) १३७९१ (०८-०४-२०१६). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पातूर (जि.अकोला) तालुक्यात वैभव असलेली नैसर्गिक संपत्ती नष्ट होण्याच्या मार्गावर असून जंगल माफीयांवर आळा घालण्याची मागणी तालुक्यातून सर्वच स्तरातून होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, तालुक्यातील जंगलाच सर्रास तोड करणारे व त्यांना सहकार्य करणारे वन अधिकारी कर्मचारी यांच्यावर काय कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२९-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) अवैध वृक्षतोडी प्रकरणाची चौकशी वनपरिक्षेत्र स्तरावर केली जाते
(३) व (४) जंगलातील अवैधतोड ही वन विभागाचे अधिकारी/कर्मचारी यांचे संगनमताने होत असल्याचे किंवा वनाधिकारी/कर्मचारी यांचा सहभाग असल्याची घटना नजरेस आली नाही. त्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे शहरातील टेकड्यांवर संरक्षणासाठी केवळ चार सुरक्षा कर्मचारी असल्याबाबत

**(५) १४५३१ (०८-०४-२०१५). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील पाचगाव पर्वती, भांबुर्डा, हनुमान टेकडी, पाषाण टेकडी, एमआयटी टेकडी, वानवडी, हडपसर, वारजे, कोंढावा अशा १९६३ हेक्टर वनक्षेत्र असलेल्या टेकड्यांवर संरक्षणासाठी केवळ चार सुरक्षा कर्मचारी असल्याची बाब माहे डिसेंबर, २०१४ च्या दुस-या आठवड्यात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) त्यामुळे गेल्या काही वर्षात या टेकडयांवर बेसुमार वृक्षतोड होत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२२-०६-२०१६) :**(१) पुणे वनविभाग व पुणे महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असलेल्या संयुक्त वन व्यवस्थापन समितीमार्फत माहे डिसेंबर, २०१४ च्या दुस-या आठवड्यात भांबुर्डा वनपरिक्षेत्राअंतर्गत पाचगाव, पर्वती, भांबुर्डा, हनुमान टेकडी, एमआयटी टेकडी, वारजे या ठिकाणी ३ सुरक्षा रक्षक कार्यरत होते, तसेच वनविभागाचे अखत्यारीतील भांबुर्डा वनपरिक्षेत्राअंतर्गत ५ वनरक्षक व २० वनमजूर कार्यरत होते व पुणे वनपरिक्षेतांर्गत १ वनरक्षक व १ वनमजुर टेकड्यावर संरक्षणासाठी कार्यरत आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) पुणे वन विभागातील अवैध वृक्षतोड रोखण्यासाठी क्षेत्रीय कर्मचारी, वनरक्षक व वनमजूर यांची गस्त वाढवून संरक्षण कामे करण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**येरवडा (ता.जि.पुणे) येथील जुन्या व्हाइट येथील सफाई कामगारांना संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाने जागा सोडण्याच्या नोटीसा दिल्याबाबत**

**(६) १७६१७ (१०-०८-२०१५). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) येरवडा (ता.जि.पुणे) येथील जुन्या व्हाइट येथे मागील १०० वर्षापासून वास्तव्य करणा-या सफाई कामगारांना संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाने जागा सोडण्याच्या नोटीसा दिल्या असल्याचे माहे मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ब्रिटीश काळापासून वाल्मीकी समाजाचे सफाई कामगार नोकरीला होते तेव्हापासून या समाजातील काही कुटूंबे उक्त परिसरात अद्याप पर्यंत वास्तव्य करीत असुन अचानक १०० वर्षाने त्यांना जागा सोडण्यात सांगण्यात येत असल्याने त्यांची होणारी गैरसोय पाहता शासन याबाबत आवश्यक ती कार्यवाही करणार आहे वा करीत आहे काय,
(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२७-०६-२०१६) :**(१) व (२) हे अंशत: खरे आहे. व्हाईट हाऊस ही मिळकत न्यायालयीन आदेशान्वये आता राज्य शासनाच्या मालकीची राहिलेली नाही. या ठिकाणी राहणाऱ्या ७ कर्मचाऱ्यांना शासकीय निवासस्थानांमध्ये स्थलांतरीत करण्याचे दिनांक ०२.१२.२०१४ व दिनांक १६.१२.२०१४ च्या आदेशान्वये रुग्णालय प्रशासनाने कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्याच्या उत्पन्नाच्या अर्धा टक्का रक्कम सार्वजनिक आरोग्य सेवेवर खर्च होत असल्याबाबत**

**(७) १९४६६ (१४-०८-२०१५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जागतिक आरोग्य संघटनेने (डब्ल्यूएचओ) मे, २०१५ च्या सुमारास जाहिर केलेल्या जगातील १९४ देशातील आरोग्यविषयक आकडेवारीचा वार्षिक अहवालात, महाराष्ट्रात राज्याच्या उत्पन्नाच्या केवळ अर्धा टक्का रक्कम सार्वजनिक आरोग्य सेवेवर खर्च करण्यात येत असल्याचे नमूद करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे मिळणा-या अपू-या सार्वजनिक आरोग्य सुविधामुळे नागरिकांना खाजगी रुग्णालयात उपचार घ्यावे लागत असल्याने खाजगी हॉस्पिटलच्या वाढत्या खर्चामुळे राज्यातील ३० लाख लोक दरवर्षी दारिद्रयरेषेत आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सार्वजनिक आरोग्य सेवेवर दरवर्षी वर्षाला केवळ ६३० रुपये खर्च करते त्याचवेळी राज्यातील सर्वसामान्य माणूस पाच व्यक्तीच्या कुटूंबाच्या आरोग्यावर दरवर्षी सरासरी ११ हजार २२५ रुपये खर्च करत आहे, हे खरे आहे काय,

(४) तसेच शेजारच्या छोट्या गोवा राज्यातील शासन दरडोई प्रतिवर्षी २ हजार २०० रुपये खर्च करते हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सरकारी दवाखान्यात डॉक्टर व साधनांचा अभाव, रुग्णांना सेवा मिळत नसल्याने नाईलाजास्तवर खाजगी रुग्णालयात जावे लागत असल्याने सार्वजनिक आरोग्य सेवा कार्यक्षम करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना आखली आहे ?

**डॉ. दीपक सावंत (०१-०७-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) राष्ट्रीय नमुना पाहणी संस्थेच्या ६० व्या फेरीनुसार अंशत: खरे आहे.

(४) निती आयोग (पूर्वीचे नियोजन आयोग) यांचे अहवालावरुन सदर आकडेवारी बरोबर आहे.

(५) हे खरे नाही.

---

**राज्यातील अंध व अपंगाचे प्रमाणपत्रे प्रलंबित असल्याबाबत**

**(८) २२०८२ (३०-०७-२०१५). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नागपूर, अमरावती, औरंगाबाद, मुंबई, नाशिक व पुणे विभागात अंध व अपंगाचे २९ हजार प्रमाणपत्रे प्रलंबित असल्याचे माहे एप्रिल, २०१५ च्या दुस-या आठवड्यात

आढळून आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने सदर प्रकरणे निकाली काढण्यासंदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०१-०७-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे. एप्रिल २०१५ अखेर १३०७८ इतकी अपंग प्रमाणपत्रे प्रलंबित होती.
(२) व (३) होय. याबाबत State Health System Resource Centre. Maharashtra यांना अभ्यास करुन शिफारशी करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार त्यांनी सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सुचना सर्व संबंधितांना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार संचालकस्तरावरुन सर्व उपसंचालक आरोग्य सेवा व जिल्हा शल्य चिकित्सक यांना सूचना निर्गमित करण्यात आलेल्या असून व्हिडीओ कॉफरन्सद्वारेही वेळोवेळी सुचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच २५ लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या जिल्ह्यांमध्ये दोन व २५ लाखांपेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या जिल्ह्यामध्ये एका अतिरिक्त रुग्णालयामध्ये अपंग प्रमाणपत्र देण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोवाड (ता. चंदगड, जि. कोल्हापूर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीची झालेली दुरवस्था

**(९) २५५३० (१४-०८-२०१५). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोवाड (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीची दुरवस्था झाल्याने तेथील रुग्णांना उपचार घेण्यास त्रासदायक होत असून लवकरात लवकर दुरुस्ती करण्याची मागणी मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पत्राद्वारे दिनांक १५ जून, २०१५ रोजी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०१-०७-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) कोवाड (ता.चंदगड, जि.कोल्हापुर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या जीर्ण इमारतीचे निर्लेखनाची कार्यवाही करण्यात आलेली असून सदर प्रा. आ. केंद्राकरिता दिनांक १२ मार्च,

२०१५ रोजीची आरोग्य समिती सभा व स्थायी समिती सभा व दिनांक १७.०६.२०१५ रोजीची जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा यामध्ये नवीन इमारत बांधकामास मान्यता प्राप्त झाली आहे. सदर प्राथमिक आरोग्य केंद्राच्या बांधकामाचे अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**उस्मानाबाद जिल्ह्यातील रुग्णालयांसाठी नव्याने खरेदी केलेल्या सोलर वॉटर हिटर प्रकरणात अपहार झाल्याची तक्रार**

**(१०) २८१९९ (२१-०१-२०१६). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्ह्यातील रुग्णालयांसाठी नव्याने खरेदी केलेल्या सोलर वॉटर हिटर प्रकरणात अपहार झाल्याच्या तक्रारीची दखल घेत जिल्हाधिकाऱ्यांनी 'डीपीडीसी' मधून ४० लाखांच्या साहित्य खरेदीची चौकशी करुन अहवाल सादर करणेबाबत राज्याच्या आरोग्य सेवा सहसंचालकांना माहे जुलै, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात पत्र दिले असल्याचे, खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावास लातूर येथील आरोग्य उपसंचालकांनी मंजुरी दिली नव्हती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मंजूर निधीतून रुग्णालयाला अत्यावश्यक असलेल्या साहित्यांची खरेदी करणे अपेक्षित असताना सोलर वॉटर हिटर खरेदी करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनस्तरावर चौकशी करण्यात आली आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२९-०६-२०१६) :**(१) हे खरे आहे.

सन २०१४-१५ मध्ये जिल्हा शल्य चिकित्सक, उस्मानाबाद यांच्यामार्फत खरेदी करण्यात आलेल्या सोलर वॉटर हिटरबाबत तक्रार प्राप्त झाल्याने सदर प्रकरणाची सखोल चौकशी करण्याबाबत जिल्हाधिकारी यांनी दिनांक २०.०६.२०१५ च्या पत्रान्वये सहसंचालक आरोग्य सेवा, रुग्णालये (राज्यस्तर), मुंबई यांना कळविले आहे.

(२) हे खरे आहे.

(३), (४) व (५) संबंधित रुग्णालयांकडून प्राप्त झालेल्या मागणीच्या आधारे जिल्हा शल्य चिकित्सक उस्मानाबाद यांनी खरेदी केली आहे. तथापि, सहसंचालक, आरोग्य सेवा रुणालये (राज्यस्तर) मुंबई यांची ८ सोलर वॉटर हिटर खरेदीस तांत्रिक मान्यता घेऊन १० वॉटर हिटर खरेदी केले. मागणीपेक्षा अधिक खरेदी व चढया दराने खरेदी करण्यात आल्याने तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक, उस्मानाबाद यांनी दिनांक २.०२.२०१६ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

---

### मौजे पाटस (तालुका दौंड, जि.पुणे) सोलापूर महामार्गावर ट्रामा सेंटर सुरु करण्याबाबत

**(११) २८३९० (२१-०१-२०१६). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पाटस (तालुका दौंड, जि.पुणे) सोलापूर महामार्गावरील अपघातांचे प्रमाण वाढल्याने येथे ट्रामा सेंटर सुरु करणेबाबत निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा. आरोग्य मंत्र्यांना माहे ऑक्टोबर, २०१५ वा त्या दरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनानुसार शासनाने ट्रामा सेंटर सुरु करणेबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, ट्रामा सेंटर सुरु करण्याबाबत कोणतीही कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२७-०६-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) मौजे पाटस (ता.दौंड, जि.पुणे) येथे ट्रामा सेंटर सुरु करणेबाबतचा प्रस्ताव क्षेत्रिय कार्यालयाकडून मागविण्यात आलेला आहे. शासनास प्रस्ताव प्राप्त झाल्यावर आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

### गुहागर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयाची नवी इमारत वापराविना पडून असल्याबाबत

**(१२) २८४५६ (२१-०१-२०१६). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर तालुक्यातील चार वर्षापूर्वी बांधण्यात आलेली ग्रामीण रुग्णालयाची इमारत वापराविना पडून आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्या रुग्णालय सुरु आहे त्या ठिकाणी वैद्‍यकीय सोयी सुविधांची कमतरता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे अथवा येत आहे,

(४) अद्‍याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**डॉ. दीपक सावंत (२७-०६-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही. तथापि, नवीन इमारतीमधील आढळलेल्या त्रुटींची पूर्तता करुन लवकरात लवकर इमारत ताब्यात मिळावी यासाठी पाठपुरावा करण्यात येत आहे. त्रुटी पूर्ण केल्यावर सार्वजनिक बांधकाम विभागाकडून इमारत ताब्यात मिळताच नवीन इमारतीमध्ये रुग्णालय कार्यान्वित करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

## उरण (जि. रायगड) येथे १०० खाटांचे रुग्णालय उभारण्याबाबतची मागणी

**(१३) २८७१६ (२१-०१-२०१६). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण (जि.रायगड) येथे मोठ्या प्रमाणात औद्योगिक क्षेत्रातील वाहतूक वाढल्याने तेथे अपघाताचे प्रमाण वाढले असून अपघातग्रस्तांवर तातडीने उपचार करण्याकरीता कोणतीही व्यवस्था नसल्यामुळे त्यांना नवी मुंबई येथे उपचार घेण्यासाठी जावे लागत असल्याने अनेकांना आपले जीव गमवावे लागत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उरण येथे १०० खाटांचे रुग्णालय उभारण्याबाबतची मागणी तेथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी निवेदनाव्दारे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्याकडे केली आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने काय निर्णयात्मक कार्यवाही केली आहे,

(४) अद्याप याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत वा कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे ?

**डॉ. दीपक सावंत (२७-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) शासन निर्णय दि.१७ जानेवारी, २०१३ अन्वये ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयाचे १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयात श्रेणीवर्धन करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयासाठी सिडकोची जागा घेण्यासाठी शासन निर्णय दि.९.२.१६ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## विदर्भात कामगारांसाठी अद्ययावत हॉस्पीटल नसल्याबाबत

**(१४) २९३३४ (२१-०१-२०१६). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भात कामगारांसाठी अद्ययावत आधुनिक सोयीसुविधांचे हॉस्पीटल नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर येथील बुटीबोरी इंडस्ट्रीज परिसरात २०० खाटांचे आधुनिक उपकरणांचे कामगार हॉस्पिटल सुरु करण्याचे शासनाने निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग २ बाबत कामगार हॉस्पिटल लवकरात लवकर सुरु करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप उक्त प्रश्नाबाबत कोणती कार्यवाही होत नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (३०-०६-२०१६) :**(१) हे अंशत: खरे आहे.
(२) व (३) हे अंशत: खे आहे.

राकावि महामंडळ, श्रम मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी बुटीबोरी नागपूर येथे १०० खाटांचे रुग्णालय सुरु करण्याचा निर्णय घेतला असून सदर रुग्णालय राकावि महामंडळामार्फत चालविण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खालापूर (जि.रायगड) हद्दीतील प्राथमिक केंद्रात डॉक्टर उपलब्ध नसल्यामुळे उपचाराअभावी मृत्यू झाल्याची घटना**

**(१५) ३१३५० (१६-०१-२०१६). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खालापूर (जि.रायगड) हद्दीत निंबोडे दांडवाडीत राहणाऱ्या ग्रामपंचायत सदस्या सुवर्धा दिपक नाईक यांचा आठ वर्षीय मूलगा स्वप्नील सर्पदंश झाल्यामुळे खालापूर प्राथमिक केंद्रात नेले असता तेथे डॉक्टर उपलब्ध नसल्यामुळे उपचाराअभावी मृत्यू झाल्याची घटना नुकतीच माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये घडली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपचाराअभावी झालेल्या मृत्यूप्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय त्यात काय आढळून आले,
(३) तद्नुसार यास जबाबदार असणाऱ्या डॉक्टरांवर कोणती कारवाई करण्यात आली आहेवा येत आहे नसल्याची त्याची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२७-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) व (३) प्राथमिक आरोग्य केंद्र, खालापूर येथील वैद्यकीय अधिकारी निवासस्थानी वास्तव्यास होते, आरोग्य सेविका व शिपाई मुख्यालयी उपस्थित होते. प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये पुरेशी औषध साठा उपलब्ध होता. सर्पदंश झालेला कु.स्वप्निल नाईक रुग्ण दि.०४.०८.२०१५ रोजी प्राथमिक आरोग्य केद्रांत न आणता गेटवरुन खोपोली येथे उपचारासाठी गेला असल्याने दोषींवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर येथील पागलखाना परिसरात जिल्हा रुग्णालयाचे कार्यालयीन इमारत बांधकामाला प्रशासकीय मान्यता देण्यासंदर्भात**

**(१६) ३२५२५ (१६-०१-२०१६). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील पागलखाना परिसरात जिल्हा रुग्णालयाकरिता आरक्षित करण्यात आलेल्या जागेवर जिल्हा शल्य चिकीत्सक कार्यालय व वेअर हाऊस यांचे बांधकामाचे रु.२८४६.८६ (लाखाचे) प्राथमिक अंदाजपत्रक व आराखडा तयार करुन मा.सहसंचालक आरोग्य

सेवा (राज्यस्त) मुंबई यांना दिनांक १८ मार्च, २०१४ च्या पत्रान्वये प्रशासकीय मंजूरीकरिता सादर केले असून याबाबत पुनश्च दिनांक १७ मार्च, २०१५ ला स्मरणपत्र जिल्हा शल्य चिकीत्सक सर्वापचार रुग्णालय, नागपूर यांनी पाठविल्याचे दिनांक २५ मे, २०१५ च्या पत्र क्र.जिशचि/सरुना/बास/जिरुबांजाऊ/३६५३ अन्वये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावाला अद्यापही मंजूरी प्रदान करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर येथील पागलखाना परिसरात अत्यावश्यक असलेल्या जिल्हा रुग्णालयाचे कार्यालयीन इमारत बांधकामाला प्रशासकीय मान्यता देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०१-०७-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) शासनस्तरावर प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### हिंगोली जिल्ह्यातील जिल्हा हिवताप कार्यालयाच्या अनागोंदी कारभाराच्या चौकशी बाबत

**(१७) ३३१०१ (२१-०३-२०१६). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यातील जिल्हा हिवताप कार्यालयाच्या अनागोंदी कारभाराची चौकशी करण्याचे आदेश जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाचे प्रशासकीय अधिकाऱ्यांना दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रशासकीय अधिकाऱ्यांनी चौकशी करुन चौकशीचा अहवाल हिवताप विभागाच्या सहसंचालक कार्यालयास पाठविल्यानंतरही सहसंचालक कार्यालयाने त्यावर कार्यवाही न करता फेर चौकशीसाठी विशेष पथक पाठवुन परत चौकशी करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रशासकीय अधिकाऱ्यांनी दिलेल्या अहवालावर कार्यवाही न करता फेरचौकशी करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदरहू दोन्ही चौकशी अहवालामध्ये काय निष्पन्न झाले आहे?

**डॉ. दीपक सावंत (२७-०६-२०१६) :**(१) होय.

(२) होय.

(३) प्रश्नासकीय अधिका-यांनी केलेल्या चौकशीमध्ये ब-याच मुद्यांवर अभिलेख उपलब्ध न झाल्याने त्यांनी निश्चित निष्कर्ष न काढल्याने पुन्हा विशेष चौकशी पथकामार्फत चौकशी करण्यात आली.

(४) चौकशीमध्ये आढळून आलेल्या प्रशासकीय व तांत्रिक त्रुटीबाबत जिल्हा हिवताप अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून त्यांचा कार्यभार काढून घेण्यात आला आहे.

---

**मालेगाव (जि.नाशिक) येथील शासकीय रुग्णालयात ठेवण्यात आलेल्या रुग्णवाहिनीचा रुग्णांना इतर रुग्णालयात नेण्यासाठी उपयोग होत नसल्याबाबत**

**(१८) ३३१२१ (२१-०१-२०१६). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव (जि.नाशिक) येथील शासकीय रुग्णालयात ठेवण्यात आलेल्या रुग्णवाहिनीचा रुग्णांना इतर रुग्णालयात नेण्यासाठी उपयोग होत नाही तसेच रुग्णालयात तज्ञ डॉक्टर नसून औषधाचाही तुटवडा असल्याने रुग्णांना उपचार मिळत नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णालयात तज्ञ डॉक्टरांची नियुक्ती करण्याबाबत औषधांचा साठा उपलब्ध करण्याबाबत तसेच रुग्णवाहीनीचा रुग्णांना इतर रुग्णालयात नेण्यासाठी वापर होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०१-०७-२०१६) :**(१) हे अंशत: खरे आहे. महाराष्ट्र वैद्यकीय सेवा, गट-अ व कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहेत ही बाब खरी आहे.

(२) व (३) वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. रुग्णालयात रुग्णांसाठी पुरेसा औषधसाठा उपलब्ध आहे. सामान्य रुग्णालय, मालेगाव येथे १०८ क्रमांकाची रुग्णवाहिका उपलब्ध आहे. तसेच १०३ क्रमांकाची जननी सुरक्षा रुग्णवाहिका उपलब्ध आहे.

---

**मौजे अकलूज (ता.माळशिरस जि.सोलापूर) येथील ५० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाचे १०० खाटांमध्ये श्रेणीवर्धन करण्याबाबत**

**(१९) ३३४७८ (२१-०१-२०१६). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे अकलूज (ता.माळशिरस, जि.सोलापूर) येथील ५० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाचे १०० खाटांमध्ये श्रेणीवर्धन करण्यास शासनाने दिनांक ९ जून, २०१४ मध्ये वा त्यासुमारास शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इमारत बांधकामाबाबतचे अंदाजपत्रक व आराखडे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अकलुज यांनी निधी उपलब्ध करुन देणेबाबत उपसंचालक, आरोग्य, सेवा पुणे यांच्यामार्फत शासनास दिनांक २३ जुलै, २०१५ रोजी सादर करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाकडून अद्यापही कोणतीच प्रशासकीय कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे कोणती,
(५) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत कार्यवाही केव्हा करण्यात येणार आहे ?

**डॉ. दीपक सावंत (२७-०६-२०१६)** :(१) मौजे अकलूज (ता.माळशिरस, जि.सोलापूर) येथील ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयाचे १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयात श्रेणीवर्धन करण्यास शासन निर्णय दि.९.६.२०१४ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.
(२) व (३) हे खरे नाही. इमारत बांधकामाचे अंदाजपत्रक व आराखडे दि.२.८.१४ रोजी शासनास प्राप्त झाले होते. सदर प्रस्तावातील त्रुटीची पूर्तता करुन फेरप्रस्ताव सादर करण्याबाबत अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अकलूज, जि.सोलापूर यांना कळविण्यात आले आहे.
(३) हे .खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अकलूज, जि.सोलापूर यांचेकडून सुधारित अंदाजपत्रक व आराखडे प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

**मेडशिंगी (ता.सांगोले, जि,सोलापूर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या स्थापनेबाबत**

**(२०) ३४३९४ (२१-०१-२०१६). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मेडशिंगी (ता.सांगोला, जि.सोलापूर) येथील ग्रामस्थांनी सदरहू इमारतीच्या बांधकामासाठी जिल्हा परिषद, सोलापूर यांना दिनांक २२ ऑगस्ट, २०१३ रोजी १ हेक्टर २० आर जमीन विनामुल्य बक्षीस पत्राने दिली, हे खरे आहे काय,
(२) सदरहू नवीन प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीचे अंदाजपत्रक तयार करून प्रशासकीय मान्यता दिली आहे काय,
(३) असल्यास, प्राथमिक आरोग्यकेंद्राच्या इमारतीची अंदाजित किंमत काय राहणार आहे,
(४) तसेच, आरोग्य केंद्राच्या इमारतीच्या बांधकामाची निविदा काढण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत,
(५) असल्यास, प्राथमिक आरोग्य केंद्राचे बांधकाम केव्हा पूर्ण होईल ?

**डॉ. दीपक सावंत (२९-०६-२०१६)** :(१) होय. दिनांक २१.६.२०१४ रोजीच्या पत्रान्वये बक्षीसपत्र दिले आहे.
(२) व (३) होय. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद सोलापुर यांनी सदरहू इमारतीच्या बांधकामासाठी रु.२,१९,७०,४९०/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता दिली आहे.

(४) व (५) बांधकाम विभाग जिल्हा परिषद, सोलापुर यांचेमार्फत ई-निविदा प्रक्रिया राबविण्यासाठी कार्यवाही करण्यात येत आहे. ई-निविदा प्रक्रिया पूर्ण करुन ठेकेदार नियुक्त करुन पुरवठा आदेश दिल्यानंतर सदरहू इमारतीचे बांधकाम पूर्ण करुन घेण्यात येईल.

---

## यवतमाळ जिल्हयातील आरोग्य विभागातील प्रशिक्षण शिबीराच्या निधीत लाखो रुपयांचा अपहार झाल्याबाबत

**(२१) ३५८७२ (२१-०१-२०१६). श्री.मदन येरावार (यवतमाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ आरोग्य विभागातील राबविण्यात येणाऱ्या जनजागृती, पुरुष नसबंदी प्रशिक्षण तसेच जिल्हा प्रशिक्षण केंद्रातून राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमामध्ये तसेच वाहनामध्ये अपहार तसेच कर्मचारी वर्षभर गैरहजर असतांना भत्त्यासहीत वेतन काढण्याचा प्रकार सन १९९६-२०१४ पर्यंत तब्बल लाखो रुपयांच्या निधीचा अपहार करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा आरोग्य अधिकारी यांना या प्रकरणात दोषारोप ठरवून कर्तव्यात कसूर करुन पदाचा दुरुपयोग करणे, व हिशोब सादर न करता शासकीय रक्कमेचा दुरुपयोग करुन रक्कम परस्पर हडप करण्याबाबतचे आरोप ठेवण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच डॉ.के.झेड.राठोड, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ यांच्यावर शिस्तभंगाची कार्यवाही करण्याबाबतचा आदेश दि.१७ मार्च, २०१० रोजी माहिती आयुक्त नागपुर यांचे पत्र क्र.१६८५, दि.०३/०४/२०१० तसेच माहिती आयुक्त अमरावती (दि.१८/१०/२०१२ पत्र क्र. ५७१/११/६३१४/१२) यांनी देवूनही अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(४) तत्कालीन जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद सन २०१२ यांचेवर दोषारोप दाखल करणे, महाराष्ट्र नागरीक सेवा, वर्तणूक नियम १९७९ चे नियम ३ चा भंग करणे व आपल्या कर्तव्यात कसूर केला असे दोषारोप करणे, याबाबत दि. ११ फेब्रुवारी, २०१३ रोजी अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई यांच्या कडे आरोग्य सेवा संचालनालय मुंबई यांनी प्रस्ताव सादर करुन चौकशी करण्याबाबतचा अहवाल सादर केला, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(६) असल्यास, सदरील चौकशी अहवालाचे स्वरुप काय आहे व त्यांच्यावर शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२९-०६-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

यवतमाळ येथे विविध कार्यक्रमामध्ये तसेच वाहनामध्ये अपहार झाला नसून लेखाविषयक प्रशासकीय अनियमितता झाल्यामुळे लेखाप्रकरणी पूर्तता करण्यात आली आहे. तथापि कर्मचारी गैरहजर असताना वेतन काढण्याचा प्रकार झाला असून त्याची वसुली सुरु आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) हे खरे नाही.

राज्य माहिती आयुक्त, नागपुर यांचे पत्र क्र. १६८५, दिनांक ०३.०४.२०१० व राज्य माहिती आयुक्त, अमरावती यांचे पत्र दिनांक १८.१०.२०१२ पत्र क्र. ५७१/११/६३१४/१२ नुसार डॉ.के.झेड राठोड यांच्याविरुध्द दिनांक १७ जानेवारी, २०१५ च्या शासन ज्ञापनान्वये विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.

(५) सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(६) श्री.जी.व्ही. मंडकमाळे हे पंचायत समिती यवतमाळ अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र सावरगड येथे आरोग्य सेवक (पुरुष) या पदावर कार्यरत असताना तेथील कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते पंचायत समिती यवतमाळ येथून काढण्यात येत होते. श्री.मंडकमाळे हे दिनांक ०४.०५.२०१२ ते दिनांक १७.०६.२०१३ या कालावधीत रजेचा अर्ज सादर करुन कर्तव्यावर गैरहजर असताना डॉ. प्रिती लामकासे, वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र सावरगड यांनी श्री.मंडकमाळे यांचे जून, जुलै, सप्टेंबर, २०१२ या तीन महिन्यांचे कर्तव्यावर उपस्थित असल्याचे प्रमाणपत्र पंचायत समिती यवतमाळ यांना सादर केले. सदर प्रकरणी चौकशी अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी जिल्हा परिषद यवतमाळ यांना दिनांक २५.०६.२०१४ रोजी सादर केलेल्या चौकशी अहवालामध्ये डॉ. (श्रीमती) लामकासे व तत्कालीन लिपिक श्री. के. एस. नगराळे हे दोषी असल्याचे नमूद केले आहे. श्री.मंडकमाळे यांना अदा करण्यात आलेली वेतन व भत्त्याची रक्कम रु. २,३६,२८२/- इतकी रक्कम वसुलपात्र असल्याचेही नमूद करण्यात आले आहे. सदर प्रकरणी संबंधितांविरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात १०८ रुग्णवाहिका सेवा पुरविणाऱ्या बी.व्ही.जी. इंडिया प्रा जि. या कंपनीकडून सेवा पुरविणाऱ्या रुग्णवाहिका दुरुस्ती अभावी बंद असल्याबाबत**

**(२२) ३७८८० (२१-०१-२०१६). डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात १०८ रुग्णवाहिका सेवा पुरविणाऱ्या बी.व्ही.जी. इंडिया प्रा जि. या कंपनीकडून सेवा पुरविताना रुग्णवाहिका दुरुस्ती अभावी बंद असणे व टायरची मर्यादा संपल्यानंतर वापर करणे, जुने टायर रिमोल्ड करणे प्रकार निदर्शनास आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) किमान ६० रुग्णांना प्रत्येक महिन्यात एका रुग्णवाहिकेद्वारे सेवा देणे अपेक्षित असताना ह्या रुग्णवाहिका दुरुस्ती व टायर अभावी बंद असल्याने किमान ठरवून दिलेले काम या रुग्णवाहिकांद्वारे होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) टायर पंक्चर झाल्याने राज्यात बऱ्याच ठिकाणी रुग्णांनी रस्त्यात बंद पडलेल्या रुग्णवाहिकेमुळे अक्षम्य हेळसांड झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच बंद असलेल्या रुग्णवाहिकेसोबतच चालू रुग्णवाहिका सुध्दा नांदेड जिल्ह्यात शासकीय आयुर्वेदिक रुग्णालय परिसरात थांबविण्यात येऊन ग्रामीण रुग्णांना रुग्णवाहिका उपलब्ध नसल्याने सांगण्यात येत आहे व या कंपनीद्वारे सेवा देण्यास टाळाटाळ करण्यात येत आहे अशीच परिस्थिती पूर्ण राज्यात आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या कंपनीला संचालक, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान जिल्हाशल्यचिकित्सक नांदेड यांनी नोटीसी देऊनही बी.व्ही.जी. कंपनीच्या कार्यात सुधारणा होत नसल्यामुळे याबाबत शासन कार्यवाही करणार आहे काय,
(६) या अत्यावश्यक सेवेबाबतचे शासनाचे धोरण काय आहे ?

**डॉ. दीपक सावंत (०१-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.
मे. बीव्हीजी इंडिया लि. कंपनीकडून सेवा पुरविताना रुग्णवाहिका या फक्त Servicing, maintenance व वाहनाच्या अत्यावश्यक दुरुस्तीसाठी तात्पुरत्या कालावधीसाठी service center मध्ये पाठविल्या जातात.
महाराष्ट्र राज्यातील काही भागामधील तसेच अतिदुर्गम भागातील रस्त्यांची परिस्थिती खराब असल्यामुळे टायर लाइफच्या अगोदरच खराब होणे असे निदर्शनास येते.
(२) या प्रकल्पासाठी करण्यात आलेल्या निविदा या करारामध्ये या प्रकारचे कोणतेही किमान रुग्ण संदर्भित करण्याचे बंधन नाही. तथापि मध्यवर्ती संपर्क कक्षामध्ये (टोल फ्री १०८) दुरध्वनीद्वारे आपत्कालीन वैद्यकीय सेवेसाठी आलेल्या प्रत्येक रुग्णास मोफत सेवा दिली जाते. या सेवेत आतापर्यंत ६ लाख ५० हजारांपेक्षा जास्त रुग्णांना आपत्कालीन सेवा देण्यात आलेली आहे.
(३) हे खरे नाही.
(४) हे खरे नाही.
महाराष्ट्र आपत्कालीन वैद्यकीय सेवा प्रकल्पाद्वारे नांदेड जिल्हयातील असणाऱ्या रुग्णवाहिका या रुग्ण घेऊन नांदेड येथील जिल्हा रुग्णालयात घेऊन आल्यानंतर फक्त तातडीचे जीवनावश्यक औषधे यांचा अतिरिक्त साठा घेण्यासाठी तसेच इतर आवश्यक औषधे घेण्यासाठी व तातडीचे रुग्णवाहिकेची तपासणी व दुरुस्तीसाठी शासकीय रुग्णालय परिसरात थांबविण्यात येऊन तात्काळ रुग्णवाहिका पूर्वीच्या ठिकाणी पाठविण्यात येतात.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) महाराष्ट्र राज्यात आपात्कालीन वैद्यकीय सेवा प्रकल्प राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या माध्यमातून राबविण्यात येत आहे. आपात्कालीन परिस्थितीत १०८ क्रमांकावर दूरध्वनी करुन रुग्णांचे नाव व ठिकाण, असलेली परिस्थिती नमूद करुन २० ते ३० मि. रुग्णवाहिका पाठविली जाते व रुग्णांवर उपचार सुरु करुनच नजीकच्या रुग्णालयात रुग्णांस पोचवावयाचे काम करण्यात येत आहे. अशा प्रकारे मिळालेल्या उपचारामुळे रुग्णांचा व आपदग्रस्तांच प्राण वाचण्यास मदत होत आहे.

---

**मलकापूर व नांदुरा (ता.मलकापूर, जि.बुलढाणा) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालय व ट्रामा केअर सेंटर सुरु झाले नसल्याबाबत**

**(२३) ३८४९६ (२१-०१-२०१६). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर व नांदुरा (ता.मलकापूर, जि.बुलढाणा) तालुक्यातील ग्रामीण भागाची वाढती लोकसंख्या लक्षात घेता येथे मंजूर झालेले ग्रामीण रुग्णालय व ट्रामा केअर सेंटर यांचे काम प्रत्यक्षदर्शी अजूनही सुरु झाले नसल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर उपक्रमासाठी शासकीय जागा उपलब्ध असल्यानंतरही कामाला सुरुवात न झाल्यामुळे तालुक्यातील गोरगरीब रुग्णांना आपत्तीच्या प्रसंगी आजारावर उपचार घेण्यासाठी बाहेरगावी किंवा जिल्ह्याबाहेर जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त समस्येबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी आरोग्य प्रशासनाला व शासनाला वेळोवेळी अवगत केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०१-०७-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.
तथापि मलकापूर येथे ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय कार्यान्वित आहे.
(२) हे खरे नाही.
(३) होय.
(४) नांदुरा येथील ग्रामीण रुग्णालय व ट्रामा केअर सेंटरसाठी दिनांक १/४/२०१६ रोजी जागा प्राप्त झाली आहे. त्याप्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन घेण्यात येत आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात विशेषत: मुंबई महानगरीमध्ये कर्करोग रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याबाबत

**(२४) ३९१०४ (१६-०१-२०१६). श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विशेषत: मुंबई महानगरीमध्ये कर्करोग रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आहार, जल, वायू यौपकी कोणत्या माध्यमातून संसर्ग अथवा इतर कोणत्या कारणांनी कर्करोग रुग्णांची संख्या वाढत आहे याची वस्तूनिष्ठ पाहणी करुन अहवाल शासनाने प्राप्त करुन घेतला आहे,
(३) असल्यास, कर्करोग रुग्णांची संख्या वढू नये म्हणून प्रतिबंधात्मक उपायोजना व कर्करोगबाधित रुग्णांना योग्य उपचार देऊन त्यांच्या आरोग्याचे संरक्षणाकरीता शासनाने काय कार्यवाही केली आहे,
(४) कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२७-०६-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) टाटा कॅन्सर रुग्णालय यांच्याकडील माहितीनुसार कर्करोग रुग्णांची संख्या ही आहार, तंबाखू सेवन, मद्यपान व स्थुलता इत्यादी कारणांमुळे वाढू शकते. या संबंधिचा वस्तुनिष्ठ अहवाल अद्याप प्रसिध्द झालेला नाही.

(३) प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून शासनातर्फे वैद्यकीय अधिकारी, समुपदेशकव महिला आरोग्य सेविकास यांचे मदतीने कर्करोगाची प्राथमिक लक्षणे, निदान व उपचार याबाबत शास्त्रोक्त पध्दतीने माहिती देऊन त्याचप्रमाणे विशेष आरोग्य शिबिरे आयोजित करुन कर्करोगाबाबत जनजागृती करण्यात येते.

कर्करोगबाधित रुग्णांना लवकर निदान आणि वेळेत आवश्यक ते उपचार मिळण्यासाठी ''महाराष्ट्र कॅन्सर वॉरीयर्स'' हा अभिनव उपक्रम टाटा मेमोरियल सेंटर यांच्या सहकार्याने सुरु करण्यात आला आहे. तसेच कर्करोग उपचारासाठी एकूण ४२८ खाजगी व १४५ शासकीय रुग्णालयांना संलग्नीत करण्यात आले असून तेथे राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेअंतर्गत लाभार्थींना मोफत उपचार उपलब्ध आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई-पुणे एक्सप्रेस वे वरील वनसंपदाची होत असलेली हानी**

**(२५) ३९४३३ (२१-०१-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-पुणे एक्सप्रेस-वे वरील वाढत्या वाहतुकीचा लाभ उठविण्यासाठी, जाहिरातदार कंपन्यांकडून महामार्गावरील वनसंपदेची अपरिमित हानी करण्यात येत असून, जाहिरात फलक उभारणाऱ्या जाहिरात कंपन्यांकडून राजरोसपणे दुर्मीळ वृक्षांची तोड करण्यात येत असल्याची बाब जागरुक पर्यावरण प्रमीनी महामार्ग वन विभाग, महामार्ग पोलीस आणि महसूल प्रशासनाच्या निदर्शनास माहे एप्रिल, २०१५ च्या दरम्यान आणून देण्यात येऊनही याप्रकरणी कोणतीच कारवाई करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार तक्रार प्राप्त होऊनही कारवाई न करणाऱ्या यंत्रणेवर कोणती कारवाई करण्यात आली आहे, तसेच जाहिरातबाजीसाठी वृक्षांची तोड करणाऱ्या जाहिरातदारांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२९-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही

---

**अहमदनगर जिल्हा रुग्णालयात मृतदेहांची हेळसाड होत असल्याबाबत**

**(२६) ३९४४३ (२१-०१-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हा रुग्णालयाची सद्यस्थितीला फार मोठ्याप्रमाणावर दुरावस्था झाली असून, मृतदेह ठेवण्यासाठी असलेले पाच शीत कप्प्यांपैकी, तीन कामे गेले वर्षभरातून बंद असल्याने मृतदेह बाहेर ठेवावे लागत असल्याने, बेवारस मृतदेहांची प्रचंड दुर्गंधी पसरत असून, मृतदेहाचे विघटन होऊन त्याची मोठ्या प्रमाणावर हेळसांड होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा रुग्णालयाच्या कारभार सुधारण्यासाठी तसेच मृतदेह ठेवण्याची शीतगृहे दुरुस्त करुन त्यांची संख्या वाढविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (०१-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.

जिल्हा रुग्णालयातील शवविच्छेदन गृहातील एकूण ५ शितपेटयांपैकी २ शितपेटया बंद होत्या. सदरच्या २ शितपेटया हया दुरुस्त करुन घेण्यात आलेल्या आहेत.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्हयातील सावली येथे वन विभागाच्या वतीने निरिक्षण कुटी किंवा वन विश्रामगृहाचे बांधकाम करण्याबाबत**

**(२७) ३९७९८ (०७-०५-२०१६). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील सावली तालुक्यात मोठया प्रमाणात वनसंपत्ती असून घनदाट जंगल असल्यामूळे सावली येथे अतिमहत्वांच्या व्यक्ती आणि अधिकांऱ्यांसाठी वन विभागाच्या वतीने निरिक्षण कुटी किंवा वन विश्रामगृहाचे बांधकाम करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी मा.वन मंत्री, प्रधान सचिव, वने यांना दिंनाक १२ जानेवारी २०१६ आणि दिंनाक ७ ऑक्टोंबर २०१५ रोजी लेखी निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन १९९२ मध्ये तालुक्याची निर्मिती झालेल्या सावली येथे अतिमहत्वांच्या व्यक्ती आणि अधिकांऱ्यांसाठी वन विभागाच्या वतीने निरिक्षण कुटी किंवा वन विश्रामगृह मंजूर करण्यात आले आहे काय वा करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, वन विभागाच्या वतीने निरिक्षण कुटी किंवा वन विश्रामगृह बांधकाम करण्यासाठी निधीची तरतुद करण्यात आलेली आहे काय वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, याबाबत अद्यापही कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३०-०६-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) चंद्रपुर जिल्हयातील सावली येथे अतिमहत्त्वांच्या व्यक्ती आणि अधिकाऱ्यांसाठी वन विभागाच्या वतीने विश्रामगृहाचा बांधकामाचा रु.५०.०० लक्षचा प्रस्ताव तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेच्या प्रक्रियेत असून, ती प्राप्त झाल्यावर निधी उपलब्ध करुन देण्याची तजविज ठेवली आहे.

---

**गोरेवाडा (जि.नागपूर) प्राणीसंग्रहालयात बेकायदेशीर प्रवेश होत असल्याबाबत**

**(२८) ४००४४ (०७-०५-२०१६). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोरेवाडा (जि.नागपूर) प्राणीसंग्रहालयात बेकायदेशीर शिरण्याचे दोन मार्ग आहेत, हे खरे आहेत काय.
(२) असल्यास, उक्त रस्त्यामुळे मोर, हरीण, ससा या वन्यप्राण्याचे अस्तित्व धोक्यात येत आहे, हे ही खरे आहे काय.
(३) असल्यास, रस्त्यांना वनविभागाने बंद करण्याचे आदेश दिले आहेत काय.
(४) असल्यास, प्राणीसंग्रहालयामध्ये म्हशी गाईची अवैद्यरित्या चराई होत आहे काय
(५) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी दखल घेतली आहे काय नसल्यास विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२८-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आरोग्य विभागाच्या कोट्यवधी रुपयांच्या डायलेसिस मशीन खरेदी करण्याच्या निविदेबाबत**

**(२९) ४०७१३ (१०-०५-२०१६). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुळातच जगभरात डायलेसिस मशीन तयार करणाऱ्या कंपन्या मर्यादित असल्याने अवाजवी खुली जागतिक स्पर्धा होणे अपेक्षित असताना आरोग्य विभागाने ‘सर्वोत्तम उपकरण’ घेण्याच्या नावाखाली निवेदेतील अटीत केलेल्या एका बदलामुळे एका विशिष्ट कंपनीला फायदा होणार असून स्पर्धा नसल्यामुळे किमान २ ते ४ लाख रूपये जास्त दराने मशीन खरेदी करावी लागेल, अशा आशयाच्या तक्रारीचे एक निवेदन मा.आरोग्यमंत्री, मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन आदीकडे जानेवारीच्या पहिल्या आठवडयात वा त्यासुमारास सादर केले आहे, हे खरे आहे काय
(२) मुंबई महापालिकेची रूग्णालये आरोग्य विभागांतर्गत येणारी जिल्हा रूग्णालय तसेच मुंबईसह देशभरातील पंचतारांकित रूग्णालयामध्ये गेली अनेक वर्षे जर्मनीच्या बिझनेस कंपनीचे डायलेसिस मशीन वापरले जाते, २०१३ मध्ये आरोग्य विभागानेही याच कंपनीचे

मशीन घेतले होती सदरहू कंपनीकडे सीई( युरोपीयन स्टण्डर्ड) प्रमाणपत्र आहे तसेच देशातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेत रूग्णांना चांगली उपकरणे व औषधे मिळावीत यासाठी शासनाची औषधे व उपकरणे खरेदी करण्याच्या अटी मध्ये जीएमपी, डब्लूएचओजीएमपी तसेच सीई युएसएफडीए आदी उपकरणे असणे बंधनकारक केले यापूवी सार्वजनिक आरोग्य विभाग, पालिका व वैद्यकिय शिक्षण विभाग उपकरणे खरेदी करताना युएसएफडीए किंवा सीई प्रमाणपत्र असणे बंधनकारक अशी अट घालत असे त्यामुळे जागतिक स्तरांवरील जास्तीत जास्त कंपन्या सहभागी होवून स्पर्धात्मक किंमतीत दर्जेदार उपकरणे मिळत असे तथापी २ वर्षापूर्वी काही अधिकाऱ्यांनी वैद्यकिय शिक्षण विभागाच्या खरेदीत युएसएफडीए आणि सीई असा निवेदेतील अटीत बदल केल्यामुळे ज्यांच्याकडे युएसएफडीए प्रमाणपत्र आहे, अशी कंपनी निविदेत शिल्लक राहण्याची शक्यता निर्माण झाली,ही बाब वैद्यकिय शिक्षणमंत्री यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी त्यात बदल केला, हेही खरे आहे काय

(३) असल्यास, याप्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय

(४) असल्यास, आरोग्य विभागाच्या कोट्यवधी रूपयांच्या डायलेसिस मशीन खरेदी करण्याच्या निविदेत फेरविचारांती योग्य तो विचार करून सध्या असलेल्या अटीमुळे एका विशिष्ट कंपनीवर मेहर नजर होण्याची शक्यता असल्याने ती अट काढून टाकण्याच्या दृष्टीने शासनाने कोणता निर्णय घेतला आहे ?

**डॉ. दीपक सावंत (२९-०६-२०१६) :**(१) हे खरे आहे.

डायलेसिस मशीन खरेदी करण्याच्या निविदेसंदर्भात श्री. संजय केळकर, विधानसभा सदस्य व मे. फ्रेझिनेस मेडिकल केअर (इंडिया) प्रा. लि. यांची निवेदने प्राप्त झाली आहेत.

(२) हे खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारितील तीन रुग्णालयामध्ये तसेच आरोग्य सेवा संचालनालयाच्या अखत्यारितील काही जिल्हा रुग्णालयामध्ये जर्मनीच्या फेझिनेस कंपनीचे डायलेसिस मशीन वापरले जातात.

वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयामार्फत हिमोडायलेसिस मशीनसाठी सन २०१४-१५ मध्ये निविदा प्रक्रिया करण्यात आली होती. सदर निविदेमध्ये सी. ई. आणि यूएसएफडीए प्रमाणपत्र आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले होते. तथापि, तदनंतर सदर निविदेत बदल करुन सी. ई. किंवा यूएसएफडीए यापैकी एक प्रमाणपत्र आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले होते.

(३) व (४) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिपत्याखालील आरोग्य संस्थांना वैद्यकीय उपकरणे (आय. सी.यू. डायलेसिस, न्यू बॉर्न केअर, शस्त्रक्रियागृह आणि रुग्णाच्या क्रिटिकल केअरसाठी लागणारी वैद्यकीय उपकरणे यासह सर्व प्रकारची वैद्यकीय उपकरणे) खरेदी करण्यासाठी यापुढे निविदा प्रसिध्द करताना CE किंवा U.S.F.D.A. यापैकी एक प्रमाणपत्र आवश्यक असल्याची अट निविदेमध्ये विहित करण्यात यावी, असा निर्णय घेण्यात आला असून त्यानुसार दिनांक ०४.०६.२०१६ च्या शासनपत्रान्वये आरोग्य सेवा संचालनालयास कळविण्यात आले आहे.

---

**सह्याद्री व्याघ्र प्रकल्पातील विनापरवाना बांधलेली पवनचक्की व रिसोर्टकडून दंड घेण्याबाबत**

**(३०) ४१२१७ (०७-०५-२०१६). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाकडे पवनचक्की व रिसोर्ट यांच्याकडून दंड स्वरुपातील बहूतांशी रक्कम वसूल करण्यात आली आहे तर अजुनही सदरच्या दंडाची थोडीफार रक्कम वसूल करणे बाकी आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास या दंडाव्यतिरीक्तही पवनचक्की कंपन्या व रिसोर्ट मालकांकडून सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाने काही रक्कमा वसूल केल्या आहेत, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, वसूल केलेल्या दंडाच्या रक्कमेचा विनीयोग करताना काही मार्गदर्शक तत्वे तयार करण्यात आली असून या मार्गदर्शक तत्वानुसारच सदरच्या रक्कमेचा या प्रकल्पाने विनीयोग केला आहे वा कसे याचा सविस्तर तपशील काय आहे

(४) दरम्यान या प्रकल्पात अनाधिकृत असणारी ९ रिसोर्ट तसेच २१५ पवनचक्की ह्या व्यतिरीक्त नव्याने घडलेली बांधकाम तसेच उभारलेल्या पवनचक्या यांच्याकडून या प्रकल्पाने दंड वसूल केला आहे काय,

(५) नसल्यास पुर्वीच्या दंडातील रक्कम वसूल करण्यात तसेच नव्याने बांधण्यात आलेल्या बांधकामाचे व पवनचक्क्याकडून दंड वसूल करणेबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे निर्णय घेतला नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२८-०६-२०१६) :**(१) केंद्रीय सशक्तता समितीने केलेल्या शिफारशीनुसार कोयना अभयारण्यात २०६ पवनचक्क्या व ९ रिसॉटचे बांधकाम केल्या प्रकरणी संबंधित यंत्रणानी स्वतः रु.३३.७० कोटी दंडाची रक्कम व्याघ्र संवर्धन प्रातिष्ठानकडे जमा करणे अपेक्षित आहे.

त्या अनुशंगाने ६६ प्रकल्प यंत्रणेपैकी ५५ प्रकल्पयंत्रणानी रु.३१.७९ कोटी दंडाची रक्कम जमा केली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) दंडाच्या रक्कमा सह्याद्री व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठानकडे जमा करण्यात आलेल्या आहेत. ह्या रकमेच्या व्याजाचा प्रतिष्ठानाच्या नियामक मंडळाच्या मान्यतेने वन्यजीव अधिवास विकासाच्या कामांसाठी विनियोग केला जातो.

(४) व (५) केंद्रीय सशक्तता समितीने केलेल्या शिफारशीनुसार कोयना अभयारण्यात २०६ पवनचक्क्या व ९ रिसॉर्टचे बांधकाम केल्या प्रकरणी दंडाची रक्कम जमा न केलेल्या पवनचक्या व रिसॉर्ट सिल करुन बंद करण्यात आले आहेत.

तसेच नव्याने पवनचक्या किंवा रिसॉर्ट उभारण्यात आलेले नाहीत तथापि नव्याने निवासी कारणासाठी करण्यात आलेल्या बांधकामावर गुन्हे नोंद करुन सदरचे गुन्हे न्यायप्रविष्ठ करणेत आलेले आहेत.

---

**मौजे वालवड (ता.राजापूर जि.रत्नागिरी) येथील पाचल तालुक्यात विनापरवाना वृक्षतोड होत असल्याबाबत**

**(३१) ४१२२३ (०७-०५-२०१६). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वालवड (ता.राजापूर जि.रत्नागिरी) येथील पाचल तालुक्यातील संबंधित महसूल व वने अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे बेकायदेशीरपणे वृक्षतोड करून गैरव्यवहार केल्याची तक्रार दिनांक ५ ऑक्टोंबर २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.मंत्री (वने) यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, उक्त तक्रारीचे सर्वसाधारण स्वरूप काय

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले आणि संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे कोणती ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२९-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही.

परंतु मा.विद्या चव्हाण (विधानपरिषद सदस्या) यांचे दिनांक २७.४.२०१६ चे पत्र दिनांक १०.६.२०१६ रोजी प्राप्त झालेले असून त्यासोबत श्री.जयप्रकाश नारकर यांचे दिनांक ०५.१०.२०१५ रोजीचे पत्र प्राप्त झाले आहे. सदर पत्र दिनांक १५.६.२०१६ रोजी मुख्य वनसंरक्षक (प्रा.), कोल्हापूर यांच्याकडे चौकशीकरीता पाठविण्यात आले आहे.

(२) रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यातील वालवड या गावातील खाजगी मालकीच्या जंगलाची मोठी तोड नुकतीच करण्यात आलेली आहे. याकडे महसूल/वन अधिकाऱ्यांनी भ्रष्टाचार करुन सदर बेकायदा जंगल तोडीकडे दुर्लक्ष केले आहे. दक्षता विभागाकडून चौकशी करावी अशी तक्रार केली आहे.

(३) तक्रार अर्ज चौकशीस पाठविण्यात आला आहे. चौकशी अहवालानुसार कार्यवाही करण्याची तजविज ठेवली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बदलापूरच्या पूर्वेला शहरालगत असलेल्या डोंगर रांगामधील टावलीचा डोंगर ते चंदेरीचा किल्ला वणव्यामुळे पेटत असल्याबाबत**

**(३२) ४२०१९ (०७-०५-२०१६). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बदलापूरच्या पूर्वेला शहरालगत असलेल्या डोंगर रांगामधील टावलीचा डोंगर ते चंदेरीचा किल्ला या दरम्यान हिवाळा सुरु झाल्यापासून वणवा पेटत असून या वणव्यामुळे डोंगरावरील वनसंपदा आणि जलसृष्टी संपुष्टात येण्याची भिती पर्यावरण प्रेमी करीत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा वणवा पेटतोच की पेटवला जातोय या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय निष्पन्न झाले आहे वा होत आहे,
(३) अद्याप, चौकशी केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२७-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही.

सदरचे क्षेत्र हे ठाणे वनवृत्तातील ठाणे व अलिबाग या दोन विभागात समाविष्ट आहे. ठाणे वनविभागातील माहे डिसेंबर, २०१५ मध्ये नियतक्षेत्र गोरेगाव, परिमंडळ वांगणी कं.न. ८१० मध्ये दिनांक २८.१२.२०१५ रोजी वणवा लागल्याचे दिसून येताच सदरचा वणवा वनपाल, वनरक्षक यांनी विझविला. सदरच्या आगीत पालापाचोळा गवत जाळून ९.०० हेक्टर क्षेत्र बाधीत झाले आहे. चंदेरीचा किल्ला हा बदलापूर क्षेत्रात येत नसून रायगड जिल्ह्यात येतो व अलिबाग वनविभागात मौजे ताणसई गावाच्या उत्तर पूर्व दिशेला चंदेरीचा किल्ला (डोंगर) आहे. सदर ठिकाणी माहे जानेवारी, २०१६ मध्ये वणवा लागल्याची घटना निदर्शनास आलेली नाही.
(२) याबाबत वनपाल, वांगणी यांनी स्थळावर जाऊन चौकशी केलेली आहे. दिनांक २८.१२.२०१५ रोजी वणवा लागल्याचे आढळून येताच त्याचक्षणी प्रथम रिपोर्ट दिनांक २८.१२.२०१५ रोजी बेवारस वनगुन्हा जारी केला आहे. कधी अनवधानाने निष्काळजीपणामुळे किंवा जाणून बूजून असामाजिक तत्वाद्वारे आगी लागण्याचे प्रकार घडतात चौकशीत आरोपी आढळलेले नाहीत.
(३) विलंब झालेला नाही.

---

### कणकवली (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील तळेरे येथे उपजिल्हा रुग्णालयासाठी ट्रामा केअर युनिट प्रलंबित असल्याबाबत

**(३३) ४४५८७ (१०-०५-२०१६). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कणकवली (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील तळेरे येथे उपजिल्हा रुग्णालयासाठी ट्रामा केअर युनिट शासनाने मंजूर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ट्रामा केअर युनिटचे काम जागे अभावी पूर्ण झालेले नाही, हे ही खरे आहे काय
(३) तसेच ट्रामा केअर युनिटसाठी लागणारी यंत्र सामग्री व आवश्यक असलेली पदे निर्माण करण्यासाठी शासनाने निधी उपलब्ध करुन दिला आहे काय,
(४) असल्यास, कालावधीत कार्यान्वीत करण्याचे नियोजन आहे वा त्यानुषंगाने कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे ?

**डॉ. दीपक सावंत (२८-०६-२०१६) :**(१) हे खरे आहे. शासन निर्णय दि. १७.०१.२०१३ नुसार तळेरे ता.कणकवली जि.सिंधुदुर्ग या राष्ट्रीय महामार्गालगतच्या ठिकाणी ग्रामीण रुग्णालय व ट्रामा केअर युनिट मंजूर करण्यात आलेले आहे.
(२) व (३) होय, हे खरे आहे.

नव्याने मंजूर ग्रामीण रुग्णालय व ट्रामा केअर युनिट च्या बांधंकामाकरीता आवश्यक जागा अद्याप उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे या आरोग्य संस्थाकरीता यंत्रसामुग्री व पदनिर्मितीसाठी निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला नाही.
(४) ट्रामा केअर युनिटच्या बांधकामाकरिता आवश्यक जागा उपलब्ध करुन घेण्याकरिता स्थानिक महसूल प्रशासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. जागा उपलब्ध होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

**जळगांव येथील शिरसोली रस्त्यावरील रायसोनी**
**अभियांत्रिकी महाविद्यालयातील दोन संरक्षित जातीच्या झाडांसह**
**एकूण ९० झाडे विनापरवाना तोडल्याबाबत**

**(३४) ४४६७८ (०७-०५-२०१६). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव येथील शिरसोली रस्त्यावरील शिरसोली रस्त्यावरील रायसोनी अभियांत्रिकी महाविद्यालयातील दोन संरक्षित जातीच्या झाडांसह एकूण ९० झाडे विनापरवानी तोडल्याबाबतची तक्रार वन्य जीव संरक्षक संस्थेच्या सदस्यांनी वन विभागाकडे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत वन विभागातील अधिकाऱ्यांनी तपासणी केली असता सदर तोडलेली झाडे महाविद्यालयाच्या आवारात पडलेली आढळली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनाची परवानगी न घेता वृक्ष तोडणाऱ्यांविरुध्द व वन विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी दिलेल्या अहवालानुसार संबंधितांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२९-०६-२०१६) :**(१) हे खरे आहे, वन्यजीव संरक्षक संस्थेच्या सदस्यांनी दुरध्वनीवरुन माहिती दिली होती,
(२) हे खरे आहे विद्यार्थी वस्तीगृहाचे पाठीमागील टेकडीचे उतारावर दोन निम प्रजातीची व सुबाभूळ प्रजाजीचा ८८ लहाने मोठी झाडे पडलेली आढळून आली होती.
(३) महाराष्ट्र वृक्षतोड अधिनियम, १९६४ अन्वये निम व सुबाभूळ प्रजातींना तोडावयाचे परवानगीची आवश्यकता नाही. सदर लाकूड मालाची वाहतूक न झाल्यामुळे भारतीय वन अधिनियम १९२७ अन्वये गुन्हा घडलेला नाही. त्यामुळे कोणताही कायदयांचा भंग झालेला नसल्यामुळे कारवाई करण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वन विभागाची जमीन रामदेव बाबा यांच्या पतंजली समुहाला औषध वनस्पतीसाठी देण्याबाबत**

**(३५) ४५४८८ (०७-०५-२०१६). श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सदा सरवणकर (माहिम), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वन विभागाच्या अखत्यारित असलेल्या वनजमिनी रामदेव बाबा यांच्या पतंजली समुहाला औषध वनस्पतीसाठी देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय असल्यास त्यात काय आढळून आले आहे,

(३) असल्यास, उक्त समुहाला कोणत्या अटी व शर्थीच्या आधारे वनजमिन व औषधी वनस्पतींच्या लागवडीसाठी देण्यात येणार आहे,

(४) अशाप्रकारे आयुर्वेद औषध निर्मितीसाठी वनजमिन मिळण्याबाबतचे प्रस्ताव इतर संस्थांकडून प्राप्त झाले आहेत काय असल्यास याबाबत शासन काय निर्णय घेणार आहे?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२७-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) गडचिरोली जिल्ह्यात गोंडवाना हर्ब्स प्रकल्पांतर्गत वनालगत राहणा-या आदिवासी व इतर ग्रामस्थांमार्फत संकलित होणा-या औषधी वनस्पती व अकाष्ठ वनोपजावर प्रक्रिया करुन त्यापासून तयार करण्यात येत असलेल्या विविध वनोत्पादनांची विक्री सद्यःस्थितीत जनधन-वनधन या विक्री केद्रामार्फत होत आहे. सदर वनोत्पादनांस व्यापक प्रसिध्दी देवून त्यास जास्तीत जास्त मोबदला प्राप्त करुन देण्याच्या दृष्टीकोनातून पतंजली व यासारख्या इतर आयुवैदिक औषधी विक्री करणा-या संस्थांशी प्राथमिक स्वरुपाची चर्चा करण्यात आली आहे. त्यात वनजमिन देण्याबाबत प्रश्न उद्भवला नाही.

(४) आयुवैद औषध निर्मितीसाठी वनजमिनी मिळण्याबाबतचे प्रस्ताव प्राप्त झालेले नाही. तथापि, राज्यस्तरीय औषध वनस्पती संसाधनाचा पुरेपुर वापराकरीता नव्याने शासकीय महामंडळाव्दारे नियोजन करण्याचा प्रस्ताव प्राप्त झाला होता.

---

**धुळे जिल्ह्यातील पिंपळनेर रेज फॉरेस्ट आर.एफ.ओ अधिकार क्षेत्रातील ४० ते ५० हेक्टर जंगल जळून त्याठिकाणी अनधिकृत जंगलतोड सुरु केल्याबाबत**

**(३६) ४५५०५ (०७-०५-२०१६). श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्ह्यातील पिंपळनेर रेज फॉरेस्ट आर.एफ.ओ अधिकार क्षेत्रातील करझटी, पायरपाडा, मळगांव, माळंबा, खट्याळी पाडा, उमर फाटा पैकी बडी पाडा, महुमाळ कडूपाडा,

पिंपळगांव ब्रु. पैकी करंझटी, पापरपाडा, सिंदपाडा, टेकपाडा, अबुटपाडा, इत्यादी गांव शिवारातील सुमारे ४० ते ५० हेक्टर जंगल जळून त्या ठिकाणी अनधिकृत जंगलतोड सुरु केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी वनविभागाकडे निवेदन देऊन अनधिकृत जंगलतोड थांबविण्याबाबत यावी अशी मागणी दिनांक २८ जानेवारी, २०१६ रोजी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर शासन कारवाई करणार वा करण्यात येत आहे काय,

(४) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२९-०६-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

लोकप्रतिनिधी यांचेकडून दिनांक १२.०१.२०१६ रोजीचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(३) व (४) सदरचे अतिक्रमण क्षेत्रात प्रोसेसिस व इतर प्रजातीच्या वृक्षाची बी पेरणी केली असून अतिक्रमण क्षेत्र विभागाच्या ताब्यात असल्याने संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागपुर जिल्हयातील देवलापार ग्रामीण रुग्णालयाचा क्ष-किरण मशीन मागणीचा प्रस्ताव**

**(३७) ४५५७९ (११-०५-२०१६). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपुर जिल्हयातील देवलापार ग्रामीण रुग्णालयाचा क्ष-किरण मशीन मागणीचा प्रस्ताव आरोग्य विभागाकडे प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देवलापुर रुग्णालयातील गैरसोयीमुळै नागरिकांना आरोग्याच्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने काही उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२७-०६-२०१६) :**(१) हे खरे आहे.

ग्रामीण रुग्णालय, देवलापार जि नागपुर येथे नवीन क्ष-किरण मशीन उपलब्ध करुन देण्याबाबत श्री.डी. मल्लीकार्जुन रेड्डी, विधानसभा सदस्य यांनी दिनांक ९.०२.२०१५ च्या पत्रान्वये मागणी केली आहे.

(२) हे खरे नाही.

ग्रामीण रुग्णालय, देवलापार, जि.नागपुर येथे वेळोवेळी मोबाईल क्ष-किरण यंत्र मागवून रुग्णांना सेवा देण्यात येते.

(३) राज्यातील आरोग्य संस्थांसाठी ३०० एम. ए. क्ष-किरण मशीन खरेदी करण्यासाठी सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात आरोग्य सेवा संचालनालयामार्फत निविदा प्रसिध्द करण्यात आली आहे. सदरहू निविदा प्रक्रिया अंतिम झाल्यानंतर ग्रामीण रुग्णालय, देवलापार, जि. नागपुर येथे नवीन क्ष-किरण मशीन उपलब्ध करुन देण्याबाबत प्राधान्याने कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे शहानूर (ता.अकोट, जि.अकोला) येथील वृध्द महिला शेतकऱ्यांच्या जमिनीवर सागाची झाडे लावून अतिक्रमण केल्याबाबत**

**(३८) ४५५९२ (०७-०५-२०१६). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे शहानूर (ता.अकोट, जि.अकोला) येथील उकनी बुवा मावस्कर (६०) या वृध्द महिला शेतकऱ्यांच्या सर्व्हे नं ३३ शी संबंधित २ हेक्टर ९४ हे. आर. क्षेत्रापैकी ०.७९ आर जागेवर प्लॉट नं.०.२९ हे आर जमिनीवर सागाची झाडे लावण्यात आली असून सदर अतिक्रमण वन विभागाच्या दुर्लक्षामुळे झाले असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या खासगी मालकीच्या जमिनीवर केलपाणी गावाचे पुनर्वसन करुन पक्की घरे बांधण्यात आली असून खासगी जमिनीवर अतिक्रमण करुन सुध्दा उपरोक्त शेतकऱ्यांला शासनाकडून अद्यापपर्यंत मोबदला मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी खाजगी जमिनीवर अतिक्रमण करण्याची व त्यानंतर शेतकऱ्याला मोबदलाही न देण्याची कारणे काय आहेत,
(४) तातडीने सदरहू शेतकऱ्यास जागेचा मोबदला देण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३०-०६-२०१६)** :(१), (२), (३) व (४) मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील केलपाणी गावाचे पुनर्वसन मलकापुर भिल शिवारातील ई-क्लास सर्व्हे क्रमांक ३९ मध्ये करण्यात आले आहे. श्रीमती उकनी बुवा मावस्कर यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, अकोला यांनी उपअधीक्षक भूमी अभिलेख, अकोट यांना सदर क्षेत्राची मोजणी करण्याचे निर्देश दिले. उपअधिक्षक भूमी अभिलेख, अकोट यांच्या अहवालानुसार श्रीमती उकनी बुवा मावस्कर हयांच्या शहानुर शिवारातील शेत सर्व्हे क्रमांक ३३ वर पुनर्वसनाच्या अनुषंगाने वन विभागाचा ताबा असल्याचे निदर्शनास आले आहे.

सदर जमिनीची भूसंपादन प्रक्रिया सुरु करण्यात आली असून संबंधित भूधारकास मोबदला देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

---

**नायगाव (ता.जि.औरंगाबाद) कृष्णुर परिसरामध्ये झाडांच्या राजरोस होत असल्याबाबत**

**(३९) ४५७९२ (०५-०५-२०१६). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नायगाव (ता.जि.औरंगाबाद) कृष्णुर परिसरामध्ये झाडांच्या राजरोस वृक्षतोड होत असून संबंधित वनविभाग व पोलिसांच्या संगनमताने प्रकार घडत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोदावरी पट्टयामध्ये मोठया प्रमाणात विटभट्या सुरु असून बहुतांशी विटभट्टयाकरीता या विभागातील निळेगाव, हिप्परगा, घुंगराळा, गगनबीड, बरबडा, काहाळा, पाटोदा, सोनठाणा आदि परिसरामध्ये लाकूड तस्करांनी आपले जाळे निर्माण केले असून लिंब, आंबा, चिंच, जांभूळ, धावडा, चिमनसार आदि झाडांच्या वृक्षतोड करण्यात येत आहेत तरी याबाबत शासन त्वरीत चौकशी करुन आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२९-०६-२०१६) :**(१) संबंधीत वनविभाग व पोलीसांचे संगनमताने प्रकार घडत असल्याचे खरे नाही. तथापि, प्रश्नात नमूद केलेला कृष्णूर परिसर हा नांदेड वनविभागांतर्गत नायगाव तालुक्यामध्ये आहे. या परिसरातलगत असलेल्या घुंगराळा व सावरखेड या ठिकाणी बिगर साग जळतनची अवैध वाहतूक होत असल्याची २ प्रकरणे माहे जानेवारी, २०१६ मध्ये आढळून आली. सदर प्रकरणी वनगुन्हा नोंदवून कार्यवाही करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खडकवासला, पुणे-राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या (एनडीए) पीकॉक-बे परिसरातील संरक्षित क्षेत्रातील जंगलात वन्यजीवदेखील सुरक्षित नसल्याबाबत**

**(४०) ४५९५५ (०७-०५-२०१६). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खडकवासला, पुणे-राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या (एनडीए) पीकॉक-बे परिसरातील संरक्षित क्षेत्रातील जंगलात वन्यजीवदेखील सुरक्षित नसल्याचे दिनांक ३१ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी वणवा पेटल्याने सध्या प्रबोधिनीच्या हद्दीवर सिमेंट कॉक्रीटची भिंत बांधल्यामुळे दहा-पंधरा मोर, चार-पाच हरणे व इतर प्राणी जीव वाचविण्यासाठी जंगलातून गावामध्ये धावपळ करीत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाकडून वन्य प्राण्यांच्या सुरक्षततेसाठी या भागात काय कार्यवाही करण्यात आली अथवा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२८-०६-२०१६)** :(१) व (२) हे खरे नाही.
(३) प्रबोधिनीच्या ताब्यात असलेल्या क्षेत्रात संबंधित अधिका-यांशी समन्वय साधून वन्यप्राण्यांच्या सुरक्षिततेबाबत काळजी घेण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वरुड तालुका (जि.अमरावती) येथे प्रशासनाच्या आर्शिवादाने मोठया प्रमाणात अवैधरित्या होत असलेली वृक्षतोड**

**(४१) ४६९९८ (०७-०५-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरुड तालुका (जि.अमरावती) येथे प्रशासनाच्या आर्शिवादाने मोठया प्रमाणात अवैध वृक्षतोड होत असून त्याची खुलेआम वाहतूक होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथील अवैध वृक्षतोड थांबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणताच निर्णय घेण्यात आला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२९-०६-२०१६)** :(१) वरुड तालुक्यात माहे ऑक्टोर ते डिसेंबर-२०१६ दरम्यान अवैध वृक्षतोडीचे १२ वनगुन्हे व अवैध वाहतुकीचे ५ वनगुन्हे असे एकूण १७ वनगुन्हे नोंदविण्यात आले असून एकूण १.६१६ घ.मी.माल जप्त करण्यात आला असून त्याची किंमत रु. ३०,९१९/- इतकी आहे.
(२) अवैध वृक्षतोड थांबविण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना राबविण्यात येत आहे
१) बिटामध्ये सतत गस्त करण्यात येते.
२) बिट तपासणी नियमितपणे करण्यात येते.
३) फिरते पथकाद्वारे गस्त करण्यात येते.
४) स्वसरंक्षणासाठी वनकर्मचाऱ्यांना शस्त्र पुरवठा करण्यात आला आहे
५) तपासणी नाके उभारण्यात आले आहेत.
६) नाकाबंदी करण्यात येते.
७) भ्रमणध्वनी व पीडीअेचा वापर करण्यात येतो.
८) सयुंक्त वनव्यवस्थापन समितीमार्फत लोकांच्या सहभागाने संरक्षण करण्यात येत असते.
९) वनावरील अवलंबन कमी व्हावे याकरीता स्थानिक लोकांना एलपीजी गॅस पुरवठा केला जातो.
१०) विविध उपकरणाद्वारे रोजगार उपलब्ध करुन दिला जातो.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आंबोली, चौकुळा, तिलारी, (जि.कोल्हापूर) परिसरात जंगली हत्तींच्या शिरकावामुळे ५ कोटी रुपयांचे नुकसान झाल्याबाबत**

**(४२) ४८७०२ (०७-०५-२०१६). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंबोली, चौकुळा, तिलारी, (जि.कोल्हापूर) परिसरात जंगली हत्तींच्या शिरकावामुळे ५ कोटी रुपयांचे नुकसान झाल्याची बाब दिनांक ३० जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नुकसानग्रस्त शेतक-यांना नुकसान मिळणेबाबत शासनाकडे लोकप्रतिनिधी यांनी वारंवार पाठपुरावा करुन देखील कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२८-०६-२०१६) :**(१) कोल्हापूर जिल्ह्यातील आंबोली, चौकुळा व तिलारी पैकी तिलारी परिसरातील मौजे पोर्ले, जेलुगडे, शेवळे, किटवडे, आंबेवाडी या गावांमध्ये दिनांक ३०.०१.२०१६ रोजी वा त्या दरम्यान वन्यहत्तीनी शेतपिकांचे नुकसान केल्याची ३९ प्रकरणे निदर्शनास आली असून संबंधित नुकसानग्रस्त शेतक-यास नुकसान भरपाईपोटी रु.२,०२,२४०/- इतकी रक्कम अदा करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भंडारा जिल्ह्यातून वाघाची शिकार करून अवयव तस्करी करणारा आरोपीने पलायन केल्याबाबत**

**(४३) ४९२५८ (०७-०५-२०१५). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यातून कट्टू सिंग ह्या ५० च्यावर वाघाची शिकार करून अवयव तस्करी करणारा आरोपी न्यायालयात आणताना केवळ वन खात्याच्या हलगर्जीपणामुळे पलायन करण्यात यशस्वी झाला असल्याचे माहे जानेवारी २०१६ मध्ये निदर्शनास आले आले, हे खरे आहे काय,

(२) राज्यातील विविध न्यायालयांनी १८८ प्रकरणांत वन खात्यातील अधिकारी यांचे हलगर्जीपणा, योग्य पुरावे सादर न करणे, तारखांना हजर न राहणे, अशी निदर्शने नोंदविण्यात आल्याचे माहे जानेवारी २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती उपाययोजना केली तसेच दोषींवर कुठली कारवाई केली अथवा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२८-०६-२०१६) :**(१) जिल्हा कारागृहातील आरोपीस न्यायालयात हजर करण्याची जबाबदारी न्यायालयाने पोलीसांकडे सोपविलेली असल्याने सदर आरोपीला न्यायालयातून हजर करुन परत कारागृहात नेताना आरोपीने पलायन केले आहे, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात वाघांच्या संरक्षणासाठी संरक्षित नसलेल्या मात्र वन्यप्राण्यांचा वापर असलेल्या वनक्षेत्रातही टायगर प्रोटेक्शन फोर्स तैनात करण्यात येणार असल्याबाबत**

**(४४) ५०१८६ (०७-०५-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात वाघांच्या संरक्षणासाठी संरक्षित नसलेल्या मात्र वन्यप्राण्यांचा वापर असलेल्या वनक्षेत्रातही टायगर प्रोटेक्शन फोर्स तैनात करण्यात येणार असल्याची माहिती दिनांक ७ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा.वन मंत्री यांनी दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या घोषणेनुसार आतापर्यंत अशा प्रकारे टायगर प्रोटेक्शन फोर्स किती ठिकाणी तैनात करण्यात आले आहे,
(३) असल्यास, त्यांच्याकडून या वन्यप्राण्यांची कोणत्या प्रकारे काळजी घेण्यात येत आहे,
(४) अद्यापपर्यंत टायगर प्रौटेक्शन फोर्स तयार केल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२८-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्ह्यातील कन्हाळगाव झरण धाबा-तोहोगाव अभयारण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(४५) ५०१९० (०७-०५-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यातील कन्हाळगाव झरण धाबा-तोहोगाव अभयारण्याच्या प्रस्तावास मंजुरी देण्याकरिता गावकऱ्यांसोबत दिनांक ९ जानेवारी, २०१६ रोजी मा. वनमंत्र्यांनी संबंधित अधिकाऱ्यांसह बेठक घेतली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त अभयारण्यास स्थानिक ग्रामस्थांनी विरोध दर्शविण्याची कारणे काय आहेत
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व त्यांचे स्वरुप काय आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२८-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे मार्फत प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने अभयारण्याची निर्मिती करुन नये याची ठळक कारणे खालीलप्रमाणे आहेत.

- अभयारण्याशी निगडीत जंगलाच्या आत व बाहेर किमान ४० गावे रस्त्यांनी जोडलेली आहे अशा सर्व गावांचे रस्ते मुख्य रत्यांना जोडणारे रस्ते याची परीसरातून जातात, ते रस्ते अभयारण्य झाल्यास बंद करावे लागेल.
- सदर क्षेत्राची निगडीत पोंभुर्णा, मुल, गोंडपिपरी या तालुक्यातील गावक-यांचा निस्तार हक्क रद्द होईल.
- सदर क्षेत्रात अभयारण्य व्हावे हे व्याघ्र प्रेमी लोकांचे शहरात आलीशान घरात राहणारे लोकांचे स्वप्न आहे. आम जनतेचे नाही. त्यामुळे अभयारण्य झाल्यास स्थानिक जनतेत असंतोष निर्माण होईल.
- सदर क्षेत्रात मोठ्या प्रमाणात वास्तव्यास असलेल्या आदिवासी तसेच इतर मागास वर्गातील हजारो कुटुंबांच्या रोजगाराचे साधन बंद होईल. त्यांचेवर उपासमारीची पाळी येईल.
- चंद्रपूर जिल्हा नक्षलग्रस्त असल्याने अभयारण्याच्या निर्मितीमुळे येथील युवक वर्ग बेरोजगार झाल्यामुळे युवक-युवती नक्षलवादाकडे प्रवृत्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

(३) महाराष्ट्र राज्य वन्यजीव मंडळाच्या दि.४.१२.२०१५ रोजीच्या १० व्या बैठकीत मंडळाने मा.उपाध्यक्ष तथा मा.मंत्री (वने) यांनी कन्हाळगांव हे क्षेत्र अभयारण्य घोषित करण्यास त्या क्षेत्रातील लोकप्रतिनिधी तसेच आजूबाजूच्या परिसरातील स्थानिकांचा विरोध असल्याची बाब मंडळाचे निदर्शनास आणून दिली. त्या अनुषंगाने पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात आला असून त्यानुसार कार्यवाही सुरु आहे.

मा.श्री.अशोक नेते, खासदार, गडचिरोली-चिमूर, मा.श्रीमती शोभाताई फडणवीस, विधान परिषद सदस्य, तसेच श्री.देवराव होळी, विसस व इतर लोकप्रतिनिधींशी चर्चा करण्यात यावी तसेच मा.मंत्री (वने) यांनी देखील सदर क्षेत्राला प्रत्यक्ष भेट दिल्यानंतर पुढील बैठकीत मंडळासमोर सदर प्रस्ताव सादर करावा.

---

**जामनेर (जि.जळगांव) तालुक्यात लाकूडाची तस्करी होत असल्याबाबत**

**(४६) ५०७२४ (०७-०५-२०१६). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यातील जामनेर तालुक्यात गेल्या तीन-चार महिन्यापासून अनधिकृतपणे लाकूड तोडीच्या घटनेत मोठया प्रमाणात वाढ झाली असून लाकडाची मोठया प्रमाणावर तस्करी होत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार अवैधरित्या तस्करी करणाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२२-०६-२०१६) :**(१) जामनेर तालुक्यात सन २०१६ मध्ये जानेवारी ते एप्रिल या कालावधीत अवैध वृक्षतोडीची ३२ प्रकरणे झाली असून त्यामध्ये १०९ वृक्षांची तोड झाली आहे व त्याची नुकसानी किंमत सुमारे १८,९३० रु. इतकी आहे. सदरची तोड प्रामुख्याने जळतण व लहान शेती अवजारे यांचेसाठी झाली आहे.
(२) व (३) सदर अवैध वृक्षतोडीबाबत वेळीच वनगुन्हे नोंदविण्यात आले आहेत. चौकशीअंती आरोपी आढळून आले नाहीत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोयगाव (जि.औरंगाबाद) येथील जंगलात वन विभागाच्या दुर्लक्षामुळे मोठ्या प्रमाणात सागवान लाकडाची तष्करी होत असल्याबाबत**

**(४७) ५१०२७ (०७-०५-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोयगाव (जि.औरंगाबाद) येथील जंगलात वन विभागाच्या दुर्लक्षमुळे मोठ्या प्रमाणात सागवान लाकडाची तष्करी होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथील जंगलातील सागवान तस्करीला पायबंद घालण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२९-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) सागवान तस्करीला पायबंद घालण्यासाठी पुढीलप्रमाणे उपाययोजना केल्या आहेत.

- वनक्षेत्रात क्षेत्रीय कर्मचाऱ्यांमार्फत नियमितपणे गस्त घालण्यात येते
- नियमितपणे बिट तपासणीचे कार्यक्रम राबविला जातो.
- अवैध वृक्षतोड रोखण्यासाठी संयुक्त वनव्यवस्थापन समितीची मदत घेतली जाते

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मेळघाट (जि.अमरावती) येथील चिखलदरा तालुक्यांतर्गत १२ गावामधून रोज २०० सागवानाच्या झाडाची तोड होत असल्याबाबत**

**(४८) ५२१३१ (०७-०५-२०१६). श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मेळघाट (जि.अमरावती) येथील चिखलदरा तालुक्यांतर्गत १२ गावामधून रोज २०० सागवानाच्या झाडाची तोड होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या वन तस्करी मध्ये आरएफओ, डीएफओ यांच्या संगनमत असल्याचे समोर आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सागवानाची अवैध तोड करुन शासनाचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आलेली आहे,
(४) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२९-०६-२०१६) :**(१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्ह्यातील माळढोक पक्षी अभयारण्याचे पुर्नगठन व पर्यावरण संवेदनशील क्षेत्र (इको सेन्सिटिव्ह झोन) शेतक-यांच्यासह इतर खाजगी जागा अडचणीत येणार असल्याबाबत**

**(४९) ५२२५६ (०७-०५-२०१६). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यातील माळढोक पक्षी अभयारण्याचे पुर्नगठन व त्या परिसरात पर्यावरण संवेदनशील क्षेत्र (इको सेन्सिटिव्ह झोन) यामुळे शेतक-यांच्यासह इतर खासगी जागा अडचणीत येणार असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अभयारण्याच्या पर्यावरण संवेदनशील क्षेत्रात विद्यापीठासह विविध महाविद्यालयांच्या इमारती आणि रहिवासी वसाहती येणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अभयारण्याचा प्रश्नाबाबत उपाययोजना करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२८-०६-२०१६) :**(१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

दिनांक २७.०२.२०१२ च्या अधिसूचनेनुसार माळठोक पक्षी अभयारण्याचे क्षेत्र १२२९.२४ चौ.कि.मी. इतके होते. ह्यात मोठया प्रमाणावार खाजगी जागांचा समावेश असल्याने त्यांच्या खरेदी-विक्री, गहाणखतासाठी अडचणी येत होत्या. माळढोक पक्षाचा अधिवासाचा विचार करुन अभयारण्य क्षेत्रात फक्त ४८०.२९ हेक्टर खाजगी संपादीत क्षेत्र ठेवून दि.०५.०३.२०१६ च्या अधिसूचनेन्वये उर्वरित खाजगी क्षेत्र वगळण्यात आले आहे. त्यामुळे आता जमिनीच्या खरेदी-विक्रीकरीता वन्यजीव (संरक्षण) अधिनियमाच्या तरतूदी आकृष्ट होत नसल्याने खरेदी-विक्रीसाठी बंधन राहिलेले नाही.

सदर अभयारण्याचे पर्यावरण संवेदनशील क्षेत्र अद्याप अधिसूचित झालेले नाही. त्यांचे क्षेत्र निश्चित करण्याची कार्यवाही चालू आहे.

---

## कडाचीवाडी (ता.खेड, जि.पुणे) गावाच्या वनपरिक्षेत्रात आग लागल्याने तीनशे एकर वरील दुर्मिळ झाडे नष्ट झाल्याबाबत

**(५०) ५२६१८ (०७-०५-२०१६). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कडाचीवाडी (ता.खेड, जि.पुणे) गावाच्या वनपरिक्षेत्रात आग लागल्याने तीनशे एकर वरील दुर्मिळ झाडे नष्ट झाल्याचे दिनांक २४ फेब्रुवारी २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वन्य प्राणी आणि सरपटणाऱ्या लहान प्राण्यांची जीवित हानी झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार दोंषीवर कोणती कारवाई करण्यात आली आहे,

(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२०-०६-२०१६) :**(१) दिनांक २४ फेब्रुवारी, २०१६ रोजी पहाटे ५.३० च्या दरम्यान मौजे चाकण, कडाची वाडी येथील वनक्षेत्रास आग लागली त्यामध्ये ३ हेक्टर क्षेत्रातील रोपवन क्षेत्रास हानी झालेली आहे. सदर वणव्याची माहिती मिळताच त्यास दिवशी सकाळी ६.०० पर्यत वनक्षेत्रातील आग विझविण्यात आलेली आहे.

(२) आगीमुळे वन्यप्राणी आणि लहान सरपटणा-या प्राण्यांची जीवीत हानी झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(३) सदर प्रकरणी चौकशी केली असून आगी बाबतच्या निश्चित कारणांचा तपास लागलेला नाही. आरोपीचा शोध चालू आहे. त्यामुळे दोषींवर कारवाई करता आलेली नाही.

(४) कार्यवाही वेळेत झालेली असल्याने विलंब झालेला नाही.

---

**विधान भवन :**<br>**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**<br>**प्रधान सचिव,**<br>**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.